**6.** The bidder (s) shall also declare if they are bidding on their own behalf or on behalf of their principals and sign declaration accordingly. In the latter case, they shall be required to deposit with the bid documents their original authority duly ink signed by their principal together with complete KYC of the said principal duly attested by the said principal together with complete KYC of the authorized person. In case of the company, authenticated copy of resolution passed by the board members of the company or any other authenticated documents confirming representation/attorney of the company together with complete KYC of the said principal company and complete KYC of the authorized person shall also be submitted alongwith the bid documents. In case of failure, bid shall not be considered.

**7.** The bidder (s) shall also upload online on the website of the aforesaid e-auction agency, after registering themselves on the website of the aforesaid e-auction agency, copy of the duly filled in prescribed bid form alongwith photocopies of the documents as stated in para 5 & 6 here in above. The last date for submission of online bid is **23.03.2026** by 4:00 P.M. The physical inspection of the properties may be taken between 10:00 A.M. and 4:00 P.M. on **17.03.2026 to 18.03.2026** at the property site.
For further details contact: **1. Shri Amit Mesram, Bank Officer - Mobile 7875832686.**

**8.** Once the bid is submitted it is mandatory for the bidder (s) to participate in the bidding process of the e-auction by logging in on the e-auction agency portal, failing which the EMD shall be forfeited to the Government, if the undersigned thinks fit.

**9.** The successful bidder shall have to deposit 25% of his final bid amount after adjustment of EMD by next bank working day i.e. by 4:00 P.M., in the said account as per details mentioned in para 4 above.

**10.** The successful highest bidder shall also deposit the balance 75% of final bid amount on or before 15th day from the date of auction sale of the property. If the 15th day is Sunday or other Holiday, then on the first bank working day after the 15th day by prescribed mode as stated in para 4 above.

**11.** In addition to the above, the successful highest bidder shall also deposit poundage fee with Recovery Officer-II, DRT-II @ 2% upto Rs.1,000/- and @ 1% of the excess of said amount of Rs.1,000/- through DD in favour of Registrar, DRT-II, Mumbai, within 15 days from the date of auction sale of the property.

**12.** In case of default of payment within the prescribed period, the deposit, after defraying the expenses of the sale, if the undersigned thinks fit, be forfeited to the Government and the defaulting successful highest bidder shall forfeit all claims to the property or the amount deposited. The property shall be resold, after the issue of fresh proclamation of sale. Further, the purchaser shall also be liable to make good of any shortfall or difference between his final bid amount and the price for which it is subsequently sold.

**13.** The property is being sold on "AS IS WHERE IS BASIS" AND "AS IS WHAT IS BASIS".

**14.** The undersigned reserves the right to accept or reject any or all bids if found unreasonable or postpone the auction at any time without assigning any reason.

**SCHEDULE**

| No. of lots | Description of the property to be sold with the names of the co-owners where the property belongs to defaulter and any other person as co-owners. | Revenue assessed upon the property or any part there of | Details of any other encumbrance to which property is liable | Claims, if any, which been have put forward to the property, and any known particulars bearing on its nature value. and other |
|---|---|---|---|---|
| 1. | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Survey No.47, admeasuring about 08 H-94.74 R. situated at Village Kahir, Taluka -Patan, Dist-Satara. | Not available | Mortgaged property | Not Known |
| 2 | Survey No.80, admeasuring about 03 H-69.8 R, situated at Village Kahir, Taluka Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 3 | Survey/Gat Nos.59 & 60/1, admeasuring about 4 H-86.09 R, situated at Village Kahir, Taluka Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 4 | Survey/Gat Nos.53.61/2 & 61/3, admeasuring about 08 H-57.46R, situated at Village Kahir, Taluka Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 5 | Survey/Gat Nos.60/2,61/1 & 74. admeasuring about 09 H-75 R. situated at Village Kahir, Taluka Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 6 | Gat Nos.92/4 & 92/6, admeasuring about 0 H-81.02 R. situated at Village Kahir, Taluka -Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 7 | Gat Nos.92/1 to 3, Gat Nos. 66 to 69 & Gat No. 80. admeasuring about 18 H-81.14.29 T, situated at Village Kahir, Taluka Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 8 | Survey/ Gat Nos. 47 & 48, about admeasuring 4 H-20.1 R.situated at Village Kahir, Taluka Patan, Dist- Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 9. | Gat Nos.23 & 56, admeasuring about 5 H-51 R, situated at Village Humbarne, Taluka Patan, Dist-Satara | Not available | Mortgaged property | Not Known |
| 10. | Combined Lot (Sr Nos 1 to 9 above) | Not available | Mortgaged property | Not Known |

Given under my hand and seal on this. **22nd day of January, 2026**.

Seal

**Sd/-**
**Bhavishya Kumar Azad,**
**Recovery Officer,**
**DRT-II, Mumbai.**

# मराठा कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी प्राप्त अर्ज प्रलंबित राहू नयेत

मुंबई : मराठा कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेटिअरच्या संदर्भात सप्टेंबर २०२५ मध्ये जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानंतर मराठवाडा महसूल विभागातील आठही जिल्ह्यांत प्रमाणपत्रांसाठी अर्ज प्राप्त होत असून, हे अर्ज प्रलंबित राहू नयेत यासाठी कार्यवाहीस गती देण्यात यावी, असे निर्देश जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले. गावपातळीपर्यंत जाऊन शासकीय यंत्रणेने सक्रियपणे प्रयत्न करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

मंत्रालयात जलसंपदा मंत्री तथा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मराठा आरक्षण उपसमितीच्या झालेल्या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणू गोपाल रेड्डी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव गणेश पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज, उपसमितीचे सदस्य, विविध विभागांचे सचिव व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

यावेळी जलसंपदा मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले, उपसमिती तसेच माजी न्यायमूर्ती संभाजी शिंदे यांनी दिलेल्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करून जात दाखले व वैधता प्रमाणपत्र वितरणातील अडथळे दूर करावेत. मराठा कुणबी जात दाखले व वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने स्पष्ट आदेश दिले असून, हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी, जिल्हा प्रशासनामार्फत सुरू असलेल्या



कार्यवाहीचा नियमित आढावा विभागीय आयुक्तांनी घ्यावा,असेही त्यांनी सांगितले.

दाखले वितरणाचा वेग वाढविण्यासाठी माजी न्यायमूर्ती शिंदे यांनी दिलेली महत्त्वपूर्ण माहिती उपयुक्त ठरणार असून, ते मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांना भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत. सप्टेंबर २०२५ नंतर प्राप्त अर्ज व वितरित दाखल्यांचे प्रमाण सध्या कमी असून, ते वाढविण्याची आवश्यकता असल्याचे मंत्री विखे-पाटील यांनी सूचित केले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले की, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध शैक्षणिक लाभ दिले जात आहेत. शिष्यवृत्ती तसेच शैक्षणिक व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती आदींसाठी ओबीसी विभाग, वैद्यकीय शिक्षण व कृषी विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्यात यावी. या दृष्टीने बैठकीचे आयोजन करावे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मराठा कुणबी उमेदवारांच्या जात प्रमाणपत्र अर्जांवर तातडीने कार्यवाही करताना प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीत सचिव गणेश पाटील तसेच विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी जात प्रमाणपत्र वितरणाची सद्यस्थिती सादर केली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रहिवासी पुरावे, वंशावळ व १९६७ पूर्वीच्या पुराव्यांच्या आधारे करण्यात येत असलेल्या नियमानुसार कार्यवाहीची माहिती दिली.

# मुंबई पालिकेतील महत्त्वाच्या समित्यांची गणिते जुळवून गट नोंदणी करणार

मुंबई : मुंबई महापालिकेतील स्थायी समितीसह विविध महत्त्वाच्या समित्यांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी गट नोंदणी करताना संख्याबळाच्या टक्केवारीचे गणित लक्षात घेतले जाईल. त्यानंतरच भाजप आणि शिवसेनेची एकत्र नोंदणी करायची, की स्वतंत्र, याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी स्पष्ट केली.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांचे निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाल्यानंतर मुंबई महापालिकेत भाजप आणि शिवसेना वगळता अन्य सर्व पक्षांनी त्यांच्या नगरसेवक गटांची नोंदणी पूर्ण केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावर असल्याने भाजपची गट नोंदणी रखडल्याचे सांगण्यात येत होते. मात्र मुख्यमंत्री परतल्यानंतरही भाजप आणि शिवसेनेची गट नोंदणी अद्याप झालेली नाही.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या नगरसेवकांची गट नोंदणी मंगळवारी (२७ जानेवारी) होणार होती. मात्र, अचानक घडलेल्या घडामोडींमुळे ही नोंदणी पुढे ढकलण्यात आली. यासंदर्भात विचारले असता मुख्यमंत्री फडणवीस यांनी गट नोंदणीमागील गणित स्पष्ट केले. ते म्हणाले, ''गट स्थापन करताना केवळ संख्या नव्हे, तर टक्केवारीचा विचार करावा लागतो. कधी एकत्रित गट नोंदणी केल्यास फायदा होतो, तर कधी वेगवेगळे गट स्थापन केल्याने अधिक लाभ मिळतो. काही वेळा एखादा छोटा गट दुसऱ्या गटासोबत जोडल्यासही फायदा होतो. महापौर आणि उपमहापौरपद वगळता उर्वरित पदांचे वाटप हे एकूण संख्येच्या टक्केवारीवर ठरते. त्यामुळे सर्व पर्यायांचा अंदाज घेऊनच निर्णय घेतला जातो'', असे त्यांनी सांगितले.

चर्चेतून निर्णय घेणार

भाजपच्या हस्तक्षेपामुळे शिवसेनेची गट नोंदणी थांबवण्यात आल्याच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हस्तक्षेप असा काही प्रकार नसतो. आम्ही एकत्र काम करणारे असून चर्चेतूनच निर्णय घेतले जातात. शिवसेनेची नोंदणी ठरल्याप्रमाणे होईल आणि त्यानुसार भाजपचीही गट नोंदणी केली जाईल. गट नोंदणीत केवळ टक्केवारीचे राजकीय गणित महत्त्वाचे असून स्थायी समितीत जास्तीतजास्त सदस्य कसे मिळतील, यासाठी योग्य संयोजन केले जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# शेकडो किमी पायपीट, 'लाल वादळ' अखेर जिंकलं, मुख्यमंत्र्यांनी घेतला मोठा निर्णय

मुंबई : वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी करावी आणि इतर मागण्यासाठी शेकडो किमी अंतर पायपीट करून मुंबईच्या दिशेनं येणाऱ्या लाल वादळाने राज्य सरकारला अखेरीस जाग आली आहे. अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळाने मंत्रालय गाठलं. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सरकारसोबत सकारात्मक चर्चा झाली. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत मोर्चा माघारी न नेण्याचा आयोजकांचा निर्धार आहे. मंत्री गिरीश महाजन आणि अधिकाऱ्यांनी मोर्चेकरांसमोर येऊन बघण्याच्या अंमलबजावणीची माहिती दिल्यानंतर मोर्चा माघारी घेण्याबाबत निर्णय घेणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, वन मंत्री गणेश नाईक, यांच्यासह मुख्य सचिव आणि विविध खात्यांचे अधिकारी यांच्यासोबत दोन तास किसान सभेच्या शिष्टमंडळाने विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.

आज अखिल भारतीय किसान सभेच्या शिष्टमंडळाने मंत्रालयातील बैठकीत शेतकऱ्यांची बाजू मांडली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे, वन मंत्री गणेश नाईक, यांच्यासह मुख्य सचिव आणि विविध खात्यांचे अधिकारी यांच्यासोबत दोन तास किसान सभेच्या शिष्टमंडळाने विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. शिष्टमंडळाने यानंतर वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमध्ये खालील प्रमाणे मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. मान्य करण्यात आलेल्या सर्व मागण्यांच्या अंमलबजावणीची संपूर्ण हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. अंमलबजावणीत त्रुटी राहू नये यासाठी मंत्री स्तरावर सातत्याचा पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिलं.

काय केल्या मागण्या मान्य?

वनाधिकार कायद्याच्या अंतर्गत दावे केलेल्या सर्व दावेदारांच्या वन हक्क दाव्यांची पुन्हा तपासणी करण्याचे यावेळी मान्य करण्यात आलं. नावं करण्यासाठी पात्र करण्यात आलेली शेती व प्रत्यक्ष ताबा यातील तफावत वन विभागाच्या चुकीच्या अभिप्रायामुळे वाढली असून त्यामुळे हजारो शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. हा अन्याय दूर करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये सर्व दाव्यांची पुन्हा तपासणी करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रांतांच्या अध्यक्षतेखाली अधिकाऱ्यांच्या समित्या नेमून प्रत्येक वन हक्क प्रकरण तपासण्याची घोषणा करण्यात आली. पुढील तीन महिन्यांत ही सर्व तपासणी करून वन जमीन धारकांना न्याय देण्यात येणार असून या प्रक्रियेला चालना देण्यासाठी मंत्र्यांच्या समविशासह अंमलबजावणी समिती गठित करण्यात आली.वन जमिनीची पीक पाहणी लावून सर्व शासकीय योजनांचा लाभ वन जमीन धारकांना देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. आदिवासी विकासमंत्र्यांनी त्या संदर्भातले आदेश निर्गमित केले.

वन जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांची भात खरेदी तसंच वरई नागली सावा आणि आदिवासी पिके, स्ट्रॉबेरी आणि बाळ हिरडा ही फळे रास्त दराने खरेदी केली जावी याबाबत किसान सभेने आग्रह धरला. भात उत्पादकांना दिला जाणारा बोनस वन जमीन धारकांनाही द्यावा



याबाबतची मागणी करण्यात आली. या व इतर सर्व शासकीय योजनांचे लाभ वन धारकांना मिळावेत यासाठी ई पीक पाहणी आवश्यक असते. वन धारकांची ई पीक पाहणी करून या सर्व योजनांचा लाभ त्यांना देण्याचे यावेळी मान्य करण्यात आले.

देवस्थान जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे त्या जमिनी करण्यासंदर्भातला कायदा किसान सभेच्या सातत्याच्या आंदोलन आणि पाठपुराव्यामुळे तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून या संदर्भातला मसुदा किसान सभेला उपलब्ध करून देण्यात आला आहे. या मसुद्यामधील काही गोष्टी स्वागतार्ह असल्या तरी त्यात काही आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता किसान सभेनं अधोरेखित केली. पुढील आठ दिवसांत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात किसान सभेच्या शिष्टमंडळाची बैठक आयोजित करून यातील त्रुटी दूर करण्याच्या बाबत निर्णय करण्यात आला.ठाणे-पालघर जिल्ह्यातील वरकस जमिनी नियमानुकुल करण्याच्या दृष्टिकोनातून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मकता दर्शवली असून याबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून या जमिनी कसणाऱ्यांना न्याय देण्याच्या बाबत मागणी मान्य करण्यात आली.

आदिवासी भागात पडणारे पाणी सात पश्चिमवाहिनी नद्यांच्या मधून समुद्राला जाऊन मिळते. हे पाणी गुजरातला वळवण्याचा काही लोकांचा प्रयत्न आहे. तसे न करता हे पाणी स्थानिकांना तसेच महाराष्ट्रातील कोरडवाहू भागाला उपलब्ध करून द्यावं ही मागणी किसान सभेनं आग्रहपूर्वक केली. विविध प्रकारचे साखळी बंधारे बांधून हे पाणी जागेवर अडवून स्थानिकांना उपलब्ध करून देण्याबाबत ठोस कृती कार्यक्रम यावेळी ठरवण्यात आला. नाशिक जिल्हाधिकारी स्तरावर याबाबत सविस्तर आराखडा करण्यात येणार असून या संपूर्ण प्रक्रियेत किसान सभेनं सादर केलेल्या प्रस्तावांचा गांभीर्याने विचार केला जाईल. समुद्राला वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळवून मराठवाड्यासह कोरडवाहू भागाला देण्याबाबतची योजना गतिमान करण्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.

पेसा अंतर्गत पदे ५०म मर्यादित भरण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून त्याची तातडीने अंमलबजावणी करून आदिवासी विभागात पेसा भरती करण्याचे यावेळी मान्य करण्यात आले. शेतकऱ्यांना दिवसा लाईट देण्याच्या बद्दल आग्रही मागणी किसान सभेने केली. ज्या जिल्ह्यांमध्ये शेती सिंचनासाठी रात्री लाईट दिली जाते त्याची माहिती तातडीने संकलित करून त्या ठिकाणी शेतकऱ्यांना दिवसा लाईट देण्याच्या बद्दल निर्णय करण्यात आला. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना अत्यंत तुटपुंजे मानधन देण्यात येते. त्यांच्या मानधनात वाढ करण्याचे आश्वासन अद्याप पाळले गेले नसल्याने याबाबत किसान सभेने आग्रह धरला. याबाबत तातडीने निर्णय करून शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची घोषणा करण्यात आली.

ग्रामीण आदिवासी दुर्गम भागामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी शाळा इमारती व खोल्यांची डागडुजी करून आवश्यक तेथे शिक्षक भरती करण्याची मागणी किसान सभेने केली होती. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी याबाबत ठोस कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

अकोले मार्गे जाणारी नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे पूर्वीच्या सर्वेक्षणाप्रमाणे व्हावी यासंदर्भामध्ये शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांना विनंती केली. नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे मार्ग बदलण्याबद्दलच्या तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत विविध प्रस्तावांचा पुनर्विचार करून मार्ग काढण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

आंदोलन मागे घेण्याबद्दलची घोषणा कधी?

किसान सभेच्या राज्य नेतृत्वाशी आणि मुख्य म्हणजे खर्डी येथे जमलेल्या आंदोलनकर्त्याशी चर्चा करून आंदोलन मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. उद्या मंगळवारी २८ सप्टेंबरला सायंकाळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि नाशिकचे जिल्हाधिकारी आंदोलकांना संबोधीत करतील आणि मग आंदोलनाबाबतचा निर्णय जाहीर केला जाईल.

# राज्यातील आयटीआयचे आधुनिकीकरण, पीएम – सेतू योजना राबविणार

**पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे यांचा समावेश**

मुंबई : राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेस आ.ज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम सेतू योजनेतून आयटीआयचे आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. या योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण केले जाणार आहे. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी हब अँड स्पोक प्रारूप विकसित केले जाणार आहे.

या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी करण्यासही मान्यता देण्यात आली. योजनेकरीता केंद्र सरकारचा ५० टक्के राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी वरील प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात एका क्लस्टरकरिता (१ हब आयटीआय व ४ स्पोक आयटीआय) पाच वर्षाकरीता अंदाजित २४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याकरीता केंद्र सरकारचे ११२ कोटी रुपये, राज्य शासनाचे ९८ कोटी रुपये आणि उद्योग क्षेत्राचा ३१ कोटी रुपयांचा वाटा असेल. त्यापैकी राज्य सरकारकडून पाच वर्षाकरीता करावयाच्या ९८ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली.

नागपूर येथील गव्हर्नमेंट आयटीआय, नागपूर आयटीआयचे हब म्हणून आधुनिकीकरण केले जाईल. मुलींसाठीचे आयटीआय, नागपूर, कामती, हिंगणा आणि बुटीबोरी येथील आयटीआयचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर येथील आयटीआय हब म्हणून आधुनिकीकरण करणार. त्याचबरोबर पैठण, खुल्ताबाद, गंगापूर आणि फुलंब्री येथील आयटीआयचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. पुण्यातील औंध येथील आयटीआयचा हब म्हणून आधुनिकीकरण केले जाणार. औंध येथील मुलींसाठीचे आयटीआय, खेड-राजगुरूनगर आणि मुळशी येथील आयटीआयचे आधुनिकीकरण करणार. एका हब आयटीआय मध्ये सरासरी चार नवीन अभ्यासक्रम सुरू केले तर दहा विद्यमान अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. स्पोक आयटीआयमध्ये दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत तर आठ अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. उद्योगांची संख्या कमी असलेल्या ठिकाणी सेवा क्षेत्र, बहुकौशल्य अभ्यासक्रम आणि उपजीविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

# ग्रंथ हे मनुष्याचे सच्चे मित्र : राज्यपाल आचार्य देवव्रत

मुंबई : समाजमाध्यमे प्रभावी असली तरीही, ग्रंथ हे माणसाचे सच्चे मित्र असून ग्रंथ वाचनाच्या माध्यमातून शांती व आंतरिक खंबीरता लाभते, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते 'घोस्ट्स, हॉरर अँड हिल्स' या कथासंग्रहाचे प्रकाशन लोकभवन येथे करण्यात आले. 'हाय ऑन कसोल' या पुस्तकाचे लेखक, पत्रकार व अध्यापक आदित्य कांत हे या पुस्तकाचे लेखक आहेत.

पुस्तकाचे नाव जरी गुढ व भयप्रद वाटत असले तरी पुस्तकातील १८ कथांच्या माध्यमातून लेखकाने सामाजिक कार्य व सकारात्मकतेचा संदेश दिला आहे. लेखकाने या लोककथांचा उपयोग करून हृदयस्पर्शी कथा लिहिल्या असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

संवेदनशीलता ही मानवाची सर्वात मोठी ओळख असून साहित्याच्या माध्यमातून युवकांमध्ये संवेदनशीलतेची भावना वृद्धिंगत झाली तर त्यातून समाजात सकारात्मक परिवर्तन होईल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

कोरोना काळात जीवन मरणाशी लढताना तशाही स्थितीत कोरोना रुग्णांना मदत करण्याची आंतरिक इच्छा होती अशी भावना लेखक आदित्य कांत यांनी यावेळी सांगितले. पुस्तक प्रकाशन सोहळ्याला रेड चिलीज एन्टरटेन्मेंटच्या व्यवसाय व्यवस्थापिका करुणा बडवाल, संगीतकार संजीव वाधवानी व चित्रपट निर्माते राजन खोसा यासह मनोरंजन व माध्यम क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# परळी वैजनाथमध्ये १३ फेब्रुवारीपासून 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शन'

मुंबई : बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातीच्या एक हजाराहून अधिक पशू प्रदर्शन होणार असून प्रदर्शनाची तयारी वेगात सुरू आहे. या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळतील. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे.


## तुनी टेक्सटाईल मिल्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः युनिट क्रमांक २०७, दुसरा मजला, इमारत क्रमांक ३ए मित्तल इंडस्ट्रियल इस्टेट, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००५९

CIN L17120 MH 1987PLC043996 ईमेल: info@tunitextiles.com,

वेब: www.tunitextiles.com तिमाही आणि नऊ महिन्यांसाठी लेखापरीक्षण न केलेल्या आर्थिक निकालांचे विवरणपत्र ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपले — रु. लाखांमध्ये

| अ. क्र. | विशेष | ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेला तिमाही लेखापरीक्षण न झालेला | ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेला तिमाही लेखापरीक्षण न झालेला | ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेले नऊ तिमाही लेखापरीक्षण न झालेला | ३१ मार्च २०२५ रोजी संपलेले वर्ष लेखापरीक्षण केलेले |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न (निव्वळ | ४,४६९.८१ | २,०११.३३ | ९,७३७.५२ | ७,६६८.७१ |
| २ | अपवादात्मक आणि/ किंवा असाधारण वस्तूंसाठी करपूर्व कालावधी, निव्वळ नफा/तोटा) | ४३.०७ | १७.२२ | १४८.०७ | ८०.२५ |
| ३ | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असाधारण वस्तूंनंतर ) | ४३.०७ | १७.२२ | १४८.०७ | ८०.२५ |
| ४ | कर नंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा असाधारण वस्तूंनंतर) | ३१.८६ | १४.०९ | १०९.५८ | ५६.६५ |
| ५ | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न या कालावधीसाठी (करानंतर) नफा/तोटा) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर) यांचा समावेश आहे | ३१.८६ | १२.९२ | १०९.५८ | ५९.६५ |
| ६ | पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटल (प्रतिमूल्य रु. १/-) | १,३०६.३१ | १,३०६.३१ | १,३०६.३१ | १,३०६.३१ |
| ७ | इतर इक्विटी | | | १८८.०३ | ७८.४६ |
| ८ | प्रति शेअर कमाई (अतिरिक्त सामान्य वस्तूंपूर्वी) प्रत्येकी रु. १/- (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी) | | | | |
| (i) | अं) मूलभूत<br>(ब) पातळ केलेले | ०.०२<br>०.०२ | ०.०१<br>०.०१ | ०.०८<br>०.०८ | ०.०४<br>०.०४ |

टीप:

१. वरील माहिती ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी स्टॉक एक्सचेंज / एस मध्ये सेबी एलओडीआर रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत दाखल केलेल्या स्टॉक एक्सचेंज / एस मध्ये दाखल केलेल्या स्टैंडअलोन अन ऑडिटेड फायनान्शियल निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अन ऑडिटेड निकालांचे संपूर्ण स्वरूप कंपनीच्या वेबसाइट www.tunitextiles.com आणि स्टॉक एक्सचेंज वेबसाइट म्हणजेच www.bseindia.com वर उपलब्ध आहे..

ठिकाण: मुंबई

तारीख: २८ जानेवारी २०२६

तुनी टेक्सटाईल मिल्स लिमिटेडसाठी

एसडी/-

**नरेंद्र कृ. सुरेका**

**व्यवस्थापकीय संचालक**


## जाहीर समन्स

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा).**

**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**

**मुख्य कार्यालय : भारत इंग्लिश स्कूल, शिवाजीनगर, एस. टी. स्टैण्ड समोर, शिवाजीनगर, पुणे- ४११००५. फोन (०२०) २५५३९९६९, २५५२१५००**

श्री गणेश मा. सहकारी पतसंस्था मर्या. -- अर्जदार

पत्ता मार्केटयार्ड, गुलटेकडीपुणे - ३७

विरुध्द.

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जयवंत दिनकर खोपडे<br>मु.पो. आंबाडे ता. भोर जि. पुणे | १ | ९००/२५ | ८६१८६४/- |
| २ | सुज जयवंत खोपडे<br>मु.पो. आंबाडे, ता. भोर जि. पुणे | २ | ९००/२५ | ८६१८६४/- |
| ३ | निलेश नामदे वाघमारे<br>प्रेमनगर वसाहत मार्केट यार्ड, पुणे-३७ | ३ | ९००/२५ | ८६१८६४/- |
| ४ | श्री. प्रशांत हरिदास भडंमुबे<br>प्रेमनगर वसाहत मार्केट यार्ड, पुणे-३७ | ४ | ९००/२५ | ८६१८६४/- |
| ५ | अनिसेत राजाभाऊ आंधळे<br>मु.पो. पिंपरी सोडस, अष्टापूरम फाटा ता. हवेली, जि. पुणे | ३ | ९०१/२५ | ५०४९५३२/- |
| ६ | वैभव विक्रम भोरडे<br>मु.पो. पिंपरी सोडस, अष्टापूर फाटा ता. हवेली, जि. पुणे | ४ | ९०१/२५ | ५०४९५३१/- |
| ७ | वैभव विक्रम भोरडे<br>मु.पो. पिंपरी सोडस, अष्टापूर फाटा ता. हवेली, जि. पुणे | ३ | ९०२/२५ | ५८४२६३७/- |
| ८ | शरद काळूराम पवार<br>३२ त्रिमुर्ती अपार्ट. कोंठाळकर कॉलनी, तळेगाव व मावळ, पुणे | ४ | ९०२/२५ | ५८४२६३७/- |
| ९ | संतोष रघुनाथ चिबे<br>बिबवेवाडी ओटा घर नं. ११२, बिबवेवाडी पुणे | १ | ९०३/२५ | ४६६१९३०/- |
| १० | नालंबद फरोद इब्राहिम<br>मंत्री मार्केट, भाजी मंडई जवळ, हडपसर पुणे - २८ | २ | ९०३/२५ | ४६६१९३०/- |
| ११ | विक्रम सुरेश रणवरे<br>रहान वस्ती, शिवनेरी नगर, कोंढवा, खुर्द पुणे-४२ | ३ | ९०३/२५ | ४६६१९३०/- |

-- जाब देणार

दर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक ०/२/२००६ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दिनांक २७/९/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

**सही/-**

**(श्री एस. एम. तांदळे),**

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**

**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**